# विद्यार्थ्यांनो, जीवनात अभ्यासाची सवय लावा

## उपनिरीक्षक पाटील यांचा सल्ला; बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

देगलूर, ता.१५ (बातमीदार): विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन काळात भरपूर अभ्यासाची सवय लावून घेतल्यास पुढील जीवन सुकर होते असा सल्ला देगलूर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा उदगीर येथील पोलिस उपनिरीक्षक अक्षय पाटील यांनी दिला.

देगलूर महाविद्यालयाच्या इयत्ता (बारावी) कला वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना निरोप दिला. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर होते. व्यासपीठावर संस्थेचे कार्यकारणी सदस्य देवेंद्रसेठ मोतेवार, प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य प्रा. डॉ. ए. बी. चिद्रावार, एम. एम. चमकुडे, प्रा. डॉ. व्ही.जी. शेरीकर.,पर्यवेक्षक एस. एन. पाटील उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेताना मेहनत, एकाग्रतेने अभ्यास करून गुणवत्ता मिळवावी. पुढील स्पर्धा परीक्षेला सामोरे जात यशस्वी व्हावे, जीवन सुकर करून घ्यावे असा सल्ला पाटील यांनी देत आपण ग्रामीण भागातून येऊन देगलूर महाविद्यालयात शिक्षण घेतले. याच महाविद्यालयाने मला घडविले आहे. मेहनतच विद्यार्थ्यांना भावी जीवन सुकर करून यशस्वी करते.सांगून त्यांनी त्यांचा पूर्ण शैक्षणिक अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडला. प्रारंभी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट दिली यानतंर गौतम भालेकर , प्रकाश सोनकाबंळे यांनी भजन गीत गायन सादर केले. प्रास्ताविक पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील यांनी केले

.उपप्राचार्य चमकुडे एम एम यांनी विवेकानंदाच्या विचारातून युवकानी घडले पाहिजे असे मनोगतात म्हटले ,उपप्राचार्य शेरीकर व्हि.जी. प्रा.डॉ धनराज लझडे यांची समायोचीत भाषणे झाली.यावेळी बारावीच्या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी महाविद्यालय राबवीत असलेल्या विविध उपक्रमाविषयीचे मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात देवेंद्रसेठ मोतेवार यांनी केला. सूत्रसंचालन प्रा. संतोष वानोळे तर आभार प्रा. रत्नाकर चिद्रावार यांनी मानले.

Scanned with OKEN Scanner